# श्री. हरिभाऊ विठ्ठलराव कुंभारे

सेवक क्र. १६ जुनी मंगळवारी, नागपूर

**अभाग्यास भाग्यप्राप्ती :**

ही एक सत्यकथा आहे, श्री. हरिभाऊ कुंभारे या अभागी व्यक्तिची. जुनी मंगळवारी, नागपूर येथे राहणारे श्री. हरिभाऊ कुंभारे यांना दोन भार्या होत्या. त्यांचे लग्न होऊन वीस वर्षे झालीत तरी त्यांना पुत्रसंतती झालेली नव्हती. बरेचसे प्रयत्न केल्यानंतरही जेव्हा त्यांना पुत्रसंतती प्राप्त झाली नाही तेव्हा ते पुत्रप्राप्तीसाठी महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्याकडे आले व प्रार्थना करु लागले. तेव्हा बाबांनी सांगितले, तुम्ही अभागी आहात. तुम्हाला या आमचा मानवधर्माचा मार्ग स्वीकारुन भाग्य बनवावे लागेल. हरिभाऊंनी बाबांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. तेव्हा बाबा म्हणाले, अनेक देवांची पुजा बंद करुन एकाच भगवान बाबा हनुमानजीला मानावे लागेल व आपल्या कुटुंबात सत्य, मर्यादा व प्रेमाने आचरण करावे लागेल. बाबांनी त्यांना एकेचाळीस दिवसांची साधना दिली. त्याप्रमाणे त्यांनी साधनेचे कार्य पुर्ण केले आणि बेचाळीसाव्या दिवशी कार्याची समाप्ती करुन बाबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे स्वतःच्या हाताने हवनकार्य केले. दररोज 'बाबा हनुमानजी' ह्या मंत्राची एकशेआठ मण्यांची तुळशीमाळ ते जपू लागले. हे कार्य करता करता चार वर्षाचा कालावधी लोटला. ह्या कालावधीमध्ये त्यांच्या स्वप्नात एक बाळ रांगत आला व दूध पिऊन अंगणात गेला असे दृश्य त्यांना दिसले. ही घटना त्यांनी बाबांच्या निवासस्थानी येऊन त्यांना सांगितली. बाबा जुमदेवजींनी त्यांना परमेश्वर पुढे काय घडवितो ते पाहण्यास सांगितले.

सौ. वत्सलाबाई सदावर्ती श्री. हरिभाऊ कुंभारे यांची धाकटी बहिण गोळीबार चौक, नागपूर येथे राहते. तिच्या पोटी जन्माला आलेली मुले जन्मल्यानंतर काही वेळाने मरण पावत. अशी तीन मुले मरण पावल्यानंतर वत्सलाबाई बाबा जुमदेवजींच्या ह्या मार्गातील एक सेवक श्री. गंगारामजी रंभाड यांच्याकडे आली व तिने त्यांना आपली हकीगत सांगितली. हे दुःख दूर होण्याकरिता अनेक प्रयत्न करुनसुध्दा दुःख दूर झाले नाही असेही तिने सांगितले. तेव्हा त्या सेवकाने तिला सांगितले की, भगवान बाबा हनुमानजींचा फोटो आहे, तिथे अगरबत्ती लाव. त्यानंतर परमेश्वर काय घडवितो ते पाहा. वत्सलाबाईने सांगितल्साप्रमाणे कार्य केल्यानंतर तिला एक मुलगी झाली व दुसरा मुलगा झाला. दोघेही कायम राहिले. तिसऱ्या वेळेस

गर्भ राहिला असतांना त्यापासून फार त्रास होऊ लागला. तेव्हा ती डागा मेमोरीयल हॉस्पीटलमध्ये तपासण्याकरिता गेली आणि औषधोपचार करु लागली. परंतु त्रास कमी झाला नाही. त्रास असह्य झाल्यामुळे आत्महत्या करावी असा विचारही तिच्या मनात आला. त्याच वेळी तिला महानत्यागी बाबा जुमदेवजींची आठवण झाली आणि लगेच वत्सलाबाई बाबांच्या निवासस्थानी आली. त्यावेळी बाबा जुमदेवजी घरी नव्हते. तेव्हा बाई तिथे असलेल्या भगवान बाबा हनुमानजींच्या फोटोसमोर बसली. कापूर व अगरबत्ती लावून भगवंताला तिने विनंती केली की भगवान बाबा हनुमानजी माझा त्रास दूर झाला तर जे होईल ते परमेश्वरा तुझ्या चरणी वाहून देईन. बाबा जुमदेवजींनी एका भगवंताची प्राप्ती केली आहे. ही परमेश्वरी कृपा जागृत आहे.

वत्सलाबाईचे उद्‌गार भगवंताने ऐकले आणि त्याचक्षणी त्या बाईचा त्रास दूर झाला. नऊ महिने पूर्ण झाले आणि एक मुलगा जन्माला आला. मुलगा आठ महिन्यांचा झाला. एके दिवशी मुलगा रांगत असतांना पायरीवरुन खाली पडला. त्याला दुखापत झाली. औषधोपचार करुनही जेव्हा दुःख दूर झाले नाही तेव्हा वत्सलाबाईने आपल्या घरच्या लोकांना सांगितले की मी भगवंताला वचन दिले आहे की हा मुलगा वाहून देईन. हा मुलगा भगवंताचा आहे. त्यांचे दुःख दूर होत नाही. तेव्हा मला मुलगा वाहून द्यावा लागेल. त्यावेळी तिच्या घरच्या लोकांनी म्हटले की, भगवंताला बोलली म्हणून मुलगा वाहून देते काय? तेव्हा वत्सलाबाई म्हणाली, ''मला त्रास होत होता. उपचार करुनही यश आले नाही. त्यामुळे मी भगवंताला वचन दिले याची कल्पना आपणास नाही. हा मुलगा आपला नाही. परमेश्वराला वाहून दिल्याशिवाय त्याची दुखापत दूर होणार नाही. असे मला नक्की वाटते. म्हणून मी आता बाबा जुमदेवजींच्या दर्शनासाठी जाते व घडलेली हकीगत बाबांना सांगते. बाबा जे मार्गदर्शन करतील त्याप्रमाणे मी वागीन.'' तेव्हा वत्सलाबाई त्या मुलाला घेऊन बाबा जुमदेवजींच्या घरी आली. बाबा जुमदेवजींना तिने आपली हकीगत सांगितली. बाबा माझ्या हातून चूक झाली. मी परमेश्वराला दिलेले वचन पूर्ण केले नाही. बाबांनी बाईचे म्हणणे ऐकून घेतले आणि सांगितले, ''बाई हा मुलगा तुझा नाही. तुला असे वचन देण्यास कोणी सांगितले.'' तेव्हा बाईने उत्तर दिले, ''बाबा मला दुःख होते म्हणून मी अंतःकरणापासून वचन दिले.'', तेव्हा बाबा म्हणाले, बाई तू मुलगा वाहून दे. तेव्हा वत्सलाबाई म्हणाली, बाबा आपण म्हणाल त्या दिवशी मुलगा वाहून देईन. त्यावेळी बाबांनी सांगितले, बाई मुलगा दान करताना हसत मुखाने दान करावा लागेल. डोळ्यात पाणी दिसल्यास मुलगा दान घेणार नाही. बाईने बाबांची अट मंजूर केली तेव्हा बाबांनी तिसऱ्या दिवशी सायंकाळी मुलाला घेऊन येण्यास बाईला सांगितले.

तो ठरलेला दिवस उजाडला. एका सेवकाला सांगून बाबांनी आपल्या घरी २५ –३० सेवक तसेच हरिभाऊ कुंभारे यांना सहकुटुंब बोलावले. व त्याप्रमाणे सर्व

उपस्थित झाले. ठरलेल्या दिवशी वत्सलाबाई मुलाला घेऊन आली. भगवान बाबा हनुमानजींच्या फोटोसमोर बसून भगवंतासमोर मुलाला झोपविले आणि कापूर अगरबत्ती लापूर भगवान बाबा हनुमानजीला म्हणू लागली, ''भगवान मी वचन दिले त्याप्रमाणे मुलगा वाहून दिला.'' कापूर विझल्यानंतर मुलाला घेऊन महानत्यागी बाबा जुमदेवजीसमोर उभी राहिली. तेव्हा बाबांनी बाईच्या डोळ्यांकडे पाहिले. तेव्हा तिच्या डोळ्यांत एक थेंब पाणी नव्हते. बाईने हसत मुखाने मुलगा बाबांना दान दिला. त्याचवेळी हरिभाऊ कुंभारे यांना समोर बोलावून बाबांनी तो मुलगा त्या अभाग्याला दान दिला. परमेश्वरी लीला अगाध आहे. तिला मानव समजू शकत नाही. हरिभाऊंनी मुलगा हातात घेतल्याबरोबर वत्सलाबाईंच्या स्तनातून दूध येणे बंद झाले आणि हरिभाऊंच्या लहान पत्नीच्या स्तनातून दूध येऊ लागले. केवढी ही परमेश्वरी लीला. त्या ठिकाणी उपस्थित असलेले सेवक ही लीला पाहून चकित झाले व म्हणू लागले, या ठिकाणी परमेश्वरी कृपा जागृत आहे. भगवंताने हे एक प्रकारचे नावीन्य घडविलेले आहे. वत्सलाबाईची पहिली दोन मुलं तिच्या चेहऱ्यावर आहेत तर दान दिलेला मुलगा हरिभाऊंच्या चेहऱ्यावर आहे. धन्य तो परमेश्वर व त्यांनी ह्या कलियुगात घडविलेली ही सत्यकथा!

* * * * *